क्र. म/नसचि/प्रशासक/ ०९/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०८ डिसेंबर २०२३

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## प्रशासक सभा क्रमांक - ०९/२०२३-२०२४

## स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **मंगळवार दि.१२/१२/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता महानगरपालिका मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

## परिशिष्ठ

१. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.२८/११/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.०२/११/२०२३ ते दि.०८/११/२०२३, दि.०९/११/२०२३ ते १५/११/२०२३, दि.१६/११/२०२३ ते दि.२२/११/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेणे.

३. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत मिरज रोड बुस्टरपंप हाऊस ते विश्रामबाग जयहिंद कॉलनी टाकी पर्यंतची रायझिंग मेन पाईप बदलणे कामगिरीस भाव वाढ व मुदतवाढ देणे **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०१/१२/२०२३ चे विषयपत्र.**

४. महापालिकाक्षेत्रात हवेमधील धुळीचे प्रमाण कमी करण्याकरिता स्क्रबिंग प्रणाली अंतर्गत आऊट डोअर एअर प्युरिफायर मशिन खरेदी करणे इ-निविदा मागविणेस मान्यता देणे **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०६/१२/२०२३ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शौचालय चालविणे व देखभाल दुरुस्तीसह एजन्सी / संस्था नियुक्ती कामी इ-लिलाव मागविणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०६/१२/२०२३ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे सेवाकरार पध्दतीने नियुक्त केलेल्या विशेष कार्यकारी अभियंता यांना मुदतवाढ देणे **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०६/१२/२०२३ चे विषयपत्र.**

७. महापालिकेच्या वतीने आयोजीत करण्यात येणाऱ्या स्व.मदनभाऊ पाटील महाकरंडक राज्यस्तरीय एकांकीका स्पर्धेसाठी अपुरी पडणारी रक्कम तबदील करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (सामान्य प्रशासन विभाग) यांचे दि.०८/१२/२०२३ चे विषयपत्र.**

**मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने**

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४ दिनांक :- ११/१२/२०२३ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची स्थायी समिती प्रशासक सभा क्र.०९ दि.११/१२/२०२३ रोजी महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय, सांगली येथे दुपारी ०३.०० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक स्थायी समिती सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ. क्र. | उपस्थितांची नावे | अ. क्र. | उपस्थितांची नावे |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुनिल पवार – प्रशासक | २. | श्री.संजय ओहोळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज |
| ३. | श्री.राहुल रोकडे – उपायुक्त,सांगली | ४. | श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता |
| ५. | श्री.सुशिलकुमार केंबळे – लेखाधिकारी | ६. | श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक |
| ७. | श्री. झगडे – स.स.प.र. | ८. | श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी |
| ९. | श्री. विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी आस्थापना | १०. | श्री.नितीन शिंदे- मालमत्ता व्यवस्थापक/कर निर्धारक,संकलक |
| ११. | श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड | १२. | श्री.अशोक माणकापुरे- प्रशासकीय अधिकारी |
| १३. | श्री. सहदेव कावडे – सहा.आयुक्त प्र.स.क्र.०१ | १४. | श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजि.वर्कशॉप,सांगली/जलवि |
| १५. | श्री.सचिन सागावकर – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.०२ | १६. | श्री. मानसिंग पाटील – सहा.आयुक्त प्र.स.क्र.०३ |
| १७. | श्री.अनिस मुल्ला – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.०४ | १८. | श्री.डॉ. रविंद्र ताटे – वैद्यकीय आरोग्याधिकारी |
| १९. | श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि. | २०. | श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष |
| २१. | श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता | २२. | श्री.शंकर भंडारे – ग्रंथपाल,सांगली |
| २३. | श्री. वैभव वाघमारे – नगररचना, सांगली. | २४. | श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक |
| २५. | श्री.सुनिल पाटील - विशेष कार्यकारी अधिकारी,पा.पु.वि. | २६. | श्री.विनायक जाधव-ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,मिरज |
| २७. | श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी | | |

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

**विषय क्र. ०१** — मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.२८/११/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

**प्रशासक** — विषय मंजुर

**विषय क्र. ०२** — मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.०२/११/२०२३ ते दि.०८/११/२०२३, दि.०९/११/२०२३ ते १५/११/२०२३, दि.१६/११/२०२३ ते दि.२२/११/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेणे

**प्रशासक** — विषय मंजुर

**विषय क्र. ०३** — महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत मिरज रोड बुस्टरपंप हाऊस ते विश्रामबाग जयहिंद कॉलनी टाकी पर्यंतची रायझिंग मेन पाईप बदलणे कामगिरीस भाव वाढ व मुदतवाढ देणे.

**पाणी पुरवठा अभियंता** — फेब्रुवारी २२ मध्ये पाईप लाईन टाकले आहे. उर्वरित पाईप लाईन टाकण्याचे राहिले आहे. पाईपचे दर वाढलेले असल्याने कामगिरी अपुर्ण आहे. चालु DSR प्रमाणे दरवाढ देण्याचे ठरले होते. त्यानुसार भाववाढ व मुदतवाढ देण्याचे आहे.

**मुख्य लेखाधिकारी** — सुधारीत अंदापत्रक तयार करुन फरक जनरलफंडातून द्यावा.

**प्रशासक** — पाणी पुरवठा ही अत्यावश्यक बाब असल्याने व नव्याने प्रक्रिया करण्यास दिनावधी जाईल व वाढीव दर ही येतील त्यामुळे फक्त पाईपची चालु दर सुचिने दरवाढ व मार्च, २०२४ पर्यंत मदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते.

| | |
|---|---|
| विषय क्र. ०४ | महापालिकाक्षेत्रात हवेमधील धुळीचे प्रमाण कमी करण्याकरिता स्क्रबिंग प्रणाली अंतर्गत आऊट डोअर एअर प्युरिफायर मशिन खरेदी करणे इ-निविदा मागविणेस मान्यता देणे |
| पर्यावरण अभियंता | एनकॅप मधून ३ नग खरेदी करण्यास निविदा मागविण्याची आहे. |
| प्रशासक | जी.एम. पोर्टलवरुन खरेदी करता येईल का? |
| पर्यावरण अभियंता | माहिती घेतलेली आहे. जी.एम. पोर्टलवर उपलब्ध नसलेने महा ई- टेंडरद्वारे खरेदीस मान्यता द्यावी. |
| प्रशासक | मंजुर |
| विषय क्र. ०५ | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शौचालय चालविणे व देखभाल दुरुस्तीसह एजन्सी / संस्था नियुक्ती कामी ई-लिलाव मागविणेस मान्यता देणे |
| वैद्यकिय आरोग्याधिकारी | महापालिकेची ३२ शौचालये चालविण्यास देणेसाठी लिलाव करण्याचा आहे. |
| उपायुक्त | प्रथम प्राधान्य कोणाला देण्याचे आहे ? |
| वैद्यकिय आरोग्याधिकारी | प्रथम मेहतर समाज संघटना, त्या नंतर कचरा वेचक महिला बचतगट व त्या नंतर महिला बचत गट यांचे पैकी जे जादा बोली देतील त्यांना लिलाव मंजुर करता येईल. |
| प्रशासक | विषय मंजुर |
| विषय क्र. ०६ | महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे सेवाकरार पध्दतीने नियुक्त केलेल्या विशेष कार्यकारी अभियंता यांना मुदतवाढ देणे. |
| पाणी पुरवठा अभियंता | श्री. पाटील यांची पाणी पुरवठा विभागाकडे आवश्यकता आहे. त्यांना मुदतवाढ देण्यात यावी. |
| प्रशासक | विषय मंजुर |
| विषय क्र. ०७ | महापालिकेच्या वतीने आयोजीत करण्यात येणाऱ्या स्व.मदनभाऊ पाटील महाकरंडक राज्यस्तरीय एकांकीका स्पर्धेसाठी अपुरी पडणारी रक्कम तबदील करणेस मान्यता देणे. |
| प्रशासकीय अधिकारी | सदरकामी तरतुद अपुरी आहे. यापुर्वी १० लक्षचा खर्च आलेला होता. चालू वर्षी फक्त ५ लक्ष तरतुद आहे. त्यामध्ये आणखी ७ लक्षची आवश्यकता आहे. तरतुद वाढवुन मिळावी. |
| प्रशासक | विषय मंजुर |

येणप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

**दिनांक :- ११/१२/२०२३**

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ६६** **दिनांक :- ११/१२/२०२३**

**विषय क्रमांक :- ०१**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.२८/११/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.६४ ते ठराव क्र६५ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-** ६४० **दिनांक :- ११/१२/२०२३**

**विषय क्रमांक :- ०२**

---

सोबतचे उपायुक्त (अग्निशमन विभाग) यांचे दि.०७/१२/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.०२/११/२०२३ ते दि.०८/११/२०२३, दि.०९/११/२०२३ ते १५/११/२०२३, दि.१६/११/२०२३ ते दि.२२/११/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेवून ही सभा परत पाठवित आहे.

मुख्य अग्निशमन अधिकारी.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक** :- ६८ **दिनांक :- ११/१२/२०२३**

**विषय क्रमांक :- ०३**

---

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०१/१२/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत मिरज रोड बुस्टरपंप हाऊस ते विश्रामबाग जयहिंद कॉलनी टाकी पर्यंतची रायझिंग मेन पाईप बदलणे कामगिरी मक्तेदार मे कृष्णा इंडस्ट्रिज सांगली यांचे नावे एस्ट्रीमेट पेक्षा १४.९६% जादा दराने (सुधारीत दरसुची नुसार) खर्चाच्या १.१४% कमी दराने मा.स्थायी समिती ठराव क्र.१३० दि.१५/१२/२०२० अन्वये मंजुर असून ठेकेदार याने सदर कामगिरी पैकी एश्नियन रेडीओ हाऊस पर्यंत पाई खुदाई भराई करुन कामगिरी केलेली आहे व उर्वरित काम पाईपचा पुरवठा रखडल्याने होऊ शकलेले नाही. सदर ठेकेदार याने पुरवठा केलेल्या पाईप चे देयक आदा करणेबाबत मागणी केलेली आहे. तसेच पाईपच्या दरातील अधिक प्रमाणातील दरवाढीमुळे ठेकेदार याने दरवाढ मिळणेची विनंती केली आहे. ठेकेदार यांचेकडून पाईपच्या दरवाढीमुळे उर्वरित पाईपचा पुरवठा मंजुर दराने होणे शक्य नाही. उपरोक्त पाईप लाईनची कामगिरी शहरातील पाणी पुरवठ्याच्या दृष्टीकोणातून अत्यंत महत्त्वाची असल्याने व पाईप लाईन ५० वर्षापूर्वीची जुनी असल्याने तातडीणे पाईप लाईन बदलणे गरजेचे आहे. तसेच सदरचे काम रद्द केल्यास पुढील काम चालु दरसुचिने करणेस विलंब लागुन अधिकचा खर्च होणार आहे. याबाबतचा सविस्तर प्रस्तावास आयुक्त दालनामध्ये मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरिक्षक यांचे समक्ष झाले चर्चे प्रमाणे मंजुर ठेकेदार यांना मुळ रु.२५७६/- प्रति मीटर दराने काम होणार नसल्याने उर्वरित १९७१ मीटर डी.आय.के.९ पाईप टाकण्यासाठी सन २०२३-२४ च्या म.जि.प्रा. दर सुचिचे दरास अनुसरुन म्हणजेच रु.४३४९/- प्रति मीटर दराने अतिरिक्त खर्चाची भाववाढ देणेस व राहिलेले उर्वरित काम करण्यासाठी सदर कामगिरीस मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

प्रतीपूरक्तप्राक्षीयता-

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-** ६९ **दिनांक :- ११/१२/२०२३**

**विषय क्रमांक :- ०४**

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०६/१२/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिकाक्षेत्रात हवेमधील धुळीचे प्रमाण कमी करण्याकरिता निश्चित केलेल्या ठिकाणी स्क्रबिंग प्रणाली अंतर्गत आऊट डोअर एअर प्युरिफायर मशिन ३ नग खरेदी करणे अंदाजपत्रकीय र.रु.२९,७६,६८४/- मात्रची कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये महा ई- निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महापालिका सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-** ७७ **दिनांक :- ११/१२/२०२३**

**विषय क्रमांक :- ०५**

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०६/१२/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३२ सार्वजनिक शौचालयाची देखभाल व स्वच्छता ठेवणेकामी व शौचालये चालविणे व देखभाल दुरुस्तीसह कामगिरीसाठी राईट ऑफ फस्ट रिफ्युजल तत्वानुसार प्रथम वाल्मीकी मेहतर समाजातील उच्चतम बोलीधारक संस्था यांना देण्यास व त्यांनी नकार दिल्यास कचरा वेचक बचतगट / महिला बचतगट यांच्यातील उच्चतम बोली धारकास देण्यास व त्यांनीही नकार दिल्यास सर्वोच्च बोली धारकास कामगिरी सोपविणेकामी जाहीर ई-लिलाव प्रक्रिया करण्यास मान्यता देणेत आहे.

सदरकामी येणार खर्च विषयपत्रात नमुद लेखाशिर्षातून होणेचा आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

वै.आ.उ.

**महापालिका सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-** ७९ **दिनांक :- ११/१२/२०२३**

**विषय क्रमांक :- ०६**

---

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०६/१२/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे सेवाकरार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या विशेष कार्यकारी अभियंता श्री.सुनिल बाबासाहेब पाटील, यांची मुदत दि.०३/१०/२०२३ रोजी संपत असून श्री. पाटील यांची पाणी पुरवठा विभागाकडे आवश्यकता असलेने त्यांना दि.०४/१०/२०२३ ते दि.०७/१०/२०२३ चार दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील ११ महिन्यासाठी मुदतवाढ देणे मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्र.शा. अधि. (आस्था)

**महापालिका सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-** ७२ **दिनांक :- ११/१२/२०२३**

**विषय क्रमांक :- ०७**

---

सोबतचे उपायुक्त (सामान्य प्रशासन विभाग) यांचे दि.०८/१२/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिकेच्या वतीने आयोजीत करण्यात येणाऱ्या स्व.मदनभाऊ पाटील महाकरंडक राज्यस्तरीय एकांकीका स्पर्धेसाठी सन २०२३-२४ चे अंदापत्रकातील लेखाशिर्ष E-००६०) कै.मदनभाऊ पाटील महाराष्ट्र राज्य एकांकीका स्पर्धा या लेखाशिर्षात र.रु.५,००,०००/- मात्रची तरतुद असून सदरची तरतुद अपुरी पडणार असल्याने सदर लेखाशिर्षावर E-००३८) निवडणूक खर्च या लेखाशिर्षातील मंजुर तरतुद रु.५ कोटी मधून र.रु.७,००,०००/- मात्रची रक्कम नमुना नं.१० (रुल नं.३० (३) ) फॉर्ममध्ये नमुद केल्यानुसार तबदील करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्र. नगरसचिव आ. धेरी

**महापालिका सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका